Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- X | ISSUE- VII | JULY | 2023 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.367 | ISSN 2349-638x

# लिंगायत तत्वज्ञानातील 'कायक' सिद्धांत - एक अभ्यास

**श्रीमती अश्विनी अशोक थळकरी**
(स.शि.)
श्रीशैल मल्लिकार्जून विद्या मंदीर,
कोळगाव-समसापूर, जि. लातूर

बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वर व त्यांच्या शरणांनी समाजात आमुलाग्र क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी अनेक नवनवीन तत्वे प्रचारात आणली. त्यापैकीच 'कायक' हे एक अद्भूत असे तत्व होय.

तत्कालीन परिस्थितीचा अभ्यास करता असे दिसून येते की, सर्व धर्मांनी, शास्त्रांनी, तत्वज्ञानांनी, धार्मिक ग्रंथांनी कायकाकडे म्हणावे असे लक्ष दिले नव्हते. जगण्यासाठी लागेल तेवढेच मिळवावे व बाकीचा वेळ देवधर्म व परमार्थ चिंतनात घालवावा असाच काहीसा उपदेश केला जात होता. अशा परिस्थितीत महात्मा बसवेश्वरांनी 'कायक' हे पूर्णतः नवीन तत्वाचे प्रतिपादन करून त्याद्वारे समाजात फार मोठे परिवर्तन घडवून आणले.

**कायकाचा अर्थ :**

कायक हा संस्कृत शब्द आहे. काय+क = शरीराने केलेले काम. याचाच अर्थ शारीरिक परिश्रम करून किंवा राबून केलेले काम असा त्याचा अर्थ होतो.[1] सामान्य अर्थाने कायक म्हणजे शारीरिक श्रम, काम, उद्योग, कष्ट असे मानले जाते. बसवादी शरणांच्या दृष्टीने कायक हा शब्द अधिक व्यापकतेने योजीलेला आहे. जगण्याची प्रत्येक धडपड ही कायक व्हायला पाहिजे, कायक हे आत्मोद्धाराचे साधन झाले पाहिजे. कायक हे जीवन निर्वाहाचा मार्ग झाला पाहिजे आणि त्यातून प्रपंचात राहून परमार्थही साधला पाहिजे. अशी शरणांची यामागची भावना दिसते.[2] यावरून आपला जीवन चरितार्थ चालविण्यासाठी केलेले सत्य व शुद्ध श्रम म्हणजे कायक होय असे दिसून येते.

**कायकाचे स्वरूप :**

बसवादी शरणांच्या मते प्रत्येक क्रिया ही कायक होऊ शकत नाही. त्यांनी कायकाला एक तात्वीक बैठक दिली. शरणांच्या कायकाला दोन महत्त्वाचे नियम लागू आहेत 'सत्य' व 'शुद्ध'[3].

1) **सत्य :**

सत्य म्हणजे आहे तसे, खरेखुरे, अस्सल, स्वाभाविक, सहज, नैसर्गिक, कृत्रिमता नसलेले असे जे असते ते सत्य होय. अशा प्रकारचे कायक म्हणजे सत्यकायक होय.

2) **शुद्ध :**

येथे मुख्यतः मानसिक शुद्धी अभिप्रेत असून बाह्यशुद्धी गौण आहे. चांभार, डोहर, झाडलोट करणारे हे बाहेरूण घाणेरडे वाटत असले तरी ते अशुद्ध नव्हते. त्यांचे हृदय शुद्ध असल्यामुळे त्यांचा कायकही शुद्ध होय.

बाहेरून शुद्ध असून मनात नानाविचार भरले असतील तर असले लोकही अशुद्ध व त्यांचा व्यवहारही अशुद्ध होय. म्हणून त्यांचा उद्योग कायक होऊ शकत नाही. अक्कमहादेवी अशा लोकांना कर्मी संबोधते.

म्हणूनच असा उद्योग जो सत्य व शुद्ध असतो तोच खरा कायक होय.

**कायकाचे प्रकार :**

कायकाचे मुख्यतः दोन प्रकार आहेत.[4] कमाईचा कायक व कमाईरहित कायक.

1) **कमाईचा कायक :-** याचे पुन्हा तीन उपप्रकार पडतात.

i) श्रमप्रधान कायक (तनुकायक) - यामध्ये शारीरिक श्रमाला प्राधान्य असते. झाडलोट करणारी सत्यक्का या प्रकारात मोडतात.

ii) बुद्धीप्रधान कायक (बुद्धीकायक) - यामध्ये बौद्धीक कायकाला महत्व असते.

iii) धनप्रधान कायक (धनकायक) - यामध्ये पैसा गुंतवून उद्योग करावयाचा असतो. पैशाचा व्यवहार मुख्य असतो.

या तीन प्रकारामधून पैसा कमविला जातो म्हणून त्यांना ‘कमाईचे कायक’ असे म्हणतात.

2) **कमाईरहित कायक :** याचे पुन्हा तीन उपप्रकार पडतात.

i) सेवा कायक - यामध्ये पैशाची अपेक्षा न करता परहिताचा उद्देश ठेवून काम करण्याची भावना असते. ते निस्वार्थ काम असते. परोपकार, परहित, समाजहित, लोककल्याण करण्याची उदात्त भावना असते.

ii) कर्तव्य कायक - यामध्ये सेवेची भावना नसली तरी कर्तव्य म्हणून काम करावे लागते. आपल्या वाटेला आलेले कर्तव्य मनापासून, निष्ठेने व प्रामाणिकपणे करण्याची जबाबदारी असते.

iii)सद्भाव कायक - सामान्य लोकांना न जमणारा हा कायक प्रकार होता. आपल्या सद्भावनेने लोककल्याण साधने, पतितांचा उद्धार करणे, दुष्ट लोकांचे परिवर्तन करणे असे याचे स्वरूप होते. आध्यात्म्याच्या शिखरावर पोहोचलेल्या सिद्ध, तपोनिष्ठ, महात्म्यांनाच हा कायक करणे शक्य होते.

या तीनही प्रकारच्या कायकातून पैसा मिळत नाही म्हणून त्याला कमाईरहीत कायक असे म्हटले जाते.

**कायकाचे फायदे :**

नवचैतन्य निर्माण करणाऱ्या कायकाचे धार्मिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय, मानसशास्त्रीय, आरोग्यविषयक अशा विविध क्षेत्रात फायदे दिसून येतात. नित्य कायक केल्यामुळे आळस, भिक्षाटन, निरूद्योग, अनारोग्य, कंटाळा, गरिबी, दुःख, अपयश इत्यादी गोष्टींचे निवारण होवून आरोग्य, आनंद, कामातील वेग, समाधान, तृप्ती, उत्साह, सद्भाव, समानता, ध्येय, चिकाटी, चैतन्य, सुखनिद्रा, विशाल मनोवृत्ती, मित्रसंग्रह, नातेवाईकांची जवळीक, स्वातंत्र्य, दिर्घायुष्य, शोषणमुक्ती, व्यक्तीमत्वाचा विकास इत्यादी अनेक प्रकारचे फायदे होतात.[5]

**कायकापासून सुट :**

महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात ‘कायक वे कैलास’ याद्वारे श्रमाला प्रतिष्ठा आणि पावित्र्य मिळवून दिले. कष्टातच कैलास असतो हे कायक वे कैलास या त्यांच्या संकल्पनेचा आशय आहे. समाजातील सर्व अपराधांचे मुळ म्हणजे कायकाचा अभाव, त्याग किंवा विसर होय. म्हणूनच शरणांनी कायक हा प्रत्येकासाठी सक्तीचा केला होता. तरीही काही जणांना कायक करण्यापासून सूट देण्यात आली होती. त्यामध्ये लहान मुले, वृद्ध, रोगी, अपंग इत्यादींचा समावेश होतो.[6]

कल्याण राज्याचे प्रधानमंत्री असताना महात्मा बसवेश्वरांनी प्रत्येकाच्या हाताला काम दिले. त्यामुळे ऐतखाऊपणा नाहीसा झाला. प्रत्येक जीव श्रमजीवी झाल्यामुळे बेरोजगारी, गरिबी, दारिद्य, अन्याय, अत्याचार, गुन्हेगारी या दुष्कृत्याला आळा बसला. श्रमाला पावित्र्य आणि प्रतिष्ठा प्राप्त झाल्यामुळे श्रमिकांची कायकनिष्ठा वाढली. प्रत्येक व्यक्ती श्रम करू लागल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात भर पडून राज्याची तिजोरी अक्षयनिधी झाली.

**निष्कर्ष :**

1) महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात कायक या पूर्णतः नवीन तत्वाचे प्रतिपादन करून समाजात फार मोठे परिवर्तन घडवून आणले.
2) श्रमश्रेष्ठता, आर्थिक स्वयंपूर्णता आणि स्त्री-पुरूष आर्थिक समानता कृतीत आणणारे बसवेश्वर हे जगातले पहिले समतावादी अर्थशास्त्रज्ञ होत.
3) बसवेश्वरांच्या कारकीर्दीत कल्याणराज्याची जी भरभराट झाली त्याचे रहस्य कायक वे कैलास या महामंत्रात होते.
4) कर्तव्यबुद्धीने कर्म केल्यास पृथ्वीवरच कैलास निर्माण होवू शकतो हे सांगताना कायकाला ईश्वरापेक्षाही श्रेष्ठ स्थान दिलेले आहे.
5) कोणतेही श्रम कमीपणाचे किंवा खालच्या दर्जाचे नसून प्रत्येक कायक तेवढेच श्रेष्ठ आहे.

**संदर्भ :**

1) करडीगुद्दी, प्रा. राजशेखर, ‘कायक-दासोह-प्रसाद’, महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी, 2010, प्रथम आवृत्ती, पृ. 2
2) घुगरे, डॉ. सूर्यकांत पुजारी, डॉ. बी. बी. स्वामी, डॉ. इरेश, ‘त्रिदल’, बसव सेंटर प्रकाशन, सोलापूर, 1993, प्रथम आवृत्ती, पृ. 15
3) करडीगुद्दी, प्रा. राजशेखर, उ.नि., पृ. 3-4
4) तत्रैव, पृ. 5-7
5) पाटील, बाळासाहेब (संपा.), ‘बसवपथ’ (द्वैमासिक), बसवसमिती, बेंगळूर, मार्च-एप्रिल 2012, पृ. 23
6) करडीगुद्दी, प्रा. राजशेखर, उ.नि., पृ. 22.